# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६.०४.२०२४

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (१०.०४.२०२४ ते १६.०४.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७.०४.२०२४ ते २१.०४.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ४ | ८ | ७ | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४१ | ४२ | ४१ | ४१ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २६ | २७ | २६ | २६ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ४ | ६ | ३ | ४ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ७१ | ६० | ५७ | ५५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | ३८ | ४० | ३२ | ३४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १४ | १५ | १४ | १७ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | द.नै | प.वा | प. | प. | पु.आ. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १७, १९,२० व २१ एप्रिल दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तर दिनांक १८ एप्रिल रोजी आकाश सामान्यात: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्हयामध्ये दिनांक १७, १८, व १९ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.** सांगली जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवस **कमाल तापमान** ४०.० **ते** ४२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २६ ते २७ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५५ ते ७१% तर दुपारची सापेक्ष आद्रता ३० ते ४० % दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १४ ते १७ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १७ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान ईशारा | | **सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १७ एप्रिल** रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बांधवांनी शेतातील कामे शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी करून घ्यावीत. कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने दुपारच्या वेळी शेतात काम करणे टाळावे. बाहेर पडताना सैल, सौम्य रंगाची कपडे वापरा. टोपी, रुमाल, छत्री वापरा. सावलीच्या ठिकाणी थांबा. दुपारी १२ ते ३ उन्हात फिरू नका.<br>➢ कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशूधनाची काळजी घ्यावी.<br>➢ उन्हाळी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी शक्यतो तुषार आणि ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा.<br>➢ फळे व भाजीपाला पिकांमध्ये आच्छादनाचा वापर करावा.पिकांना पाणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी द्यावे.<br>➢ जनावरांना पुरेशे, शुद्ध व थंड पाणी पिण्यास द्यावे. जनावरांना पुरेसा प्रथिनेयुक्त आहार, हिरवा चारा आणि खनिजमिश्रण द्यावे.<br>➢ जास्त तापमानामध्ये पिकांना रासायनिक खते देणे टाळावे. |
| संदेश | | ➢ नवीन लागवड केलेल्या फळबागांमध्ये रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली देण्याची व्यवस्था करावी जेनेकरुन कोवळया रोपांचे प्रखर उन्हापासून संरक्षण होईल. |
| मका | पक्वता | ➢ पक्व मका पिकाची काढणी करावी. पावसाची शक्यता असल्याने मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| ज्वारी | पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने ज्वारीचा कडबा सुरक्षित ठिकाणी ठेवावा. सुरक्षित ठिकाणी ठेवणे शक्य नसल्यास ज्वारी कडबा पॉलीथिनच्या पेपरने झाकून घ्यावा. |
| भुईमुग | शेंगा भरणे | ➢ पावसाची उघडीप पाहून भुईमुग पिकातील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी ०.५% लोह व ०.२ % झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ५० व ७०दिवसांनी फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची | ➢ उस पिकास १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. शक्य असल्यास उसात पाचटाचे आच्छादन करावे. पाणी कमी असल्यास उसाला एक सरी आड पाणी द्यावे. |
| द्राक्ष | खरड छाटणी | ➢ खरड छाटणी:<br>➢ जर पुढील १० ते १५ दिवसांत खरड छाटणीचे नियोजन केले असेल, तर खरड छाटणीच्या हंगामासाठी पोषक तत्त्वे आणि पाणी वापराचे |

| | | |
|---|---|---|
| | | वेळापत्रक नियोजन करण्यासाठी माती आणि पाण्याचे परीक्षण करण्याचा सल्ला दिला जातो. **(जत, कडेगाव, कवठेमहांकाळ, मिरज, तासगाव, खाणापुर आणि विटा या तालुक्यांसाठी)** |
| | बेदाणे | दिनांक १७, १९,२० व २१ एप्रिल रोजी पावसाची शक्यता असल्याने बेदाणे तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शेडची काळजी घ्यावी.<br>➢ द्राक्षांपासून बेदाणे तयार करणाऱ्या शेड मध्ये पावसाचे पाणी आत येऊ तये म्हणून शेड झाकून घ्यावेत.<br>➢ पावसाचे पाणी बेदाणे शेड मध्ये आल्यास त्वरित बाहेर काढावे जेणेकरून शेडमधील आद्रता वाढणार नाही.<br>➢ बेदाणे सुकविण्यासाठी असणाऱ्या शेडच्या जवळपास पावसाचे पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी.<br>➢ शेडमध्ये आद्रता वाढली असल्यास पंखे चालू करून आद्रता कमी करण्याचा प्रयत्न करावा. |
| टोमॅटो | फळ धारणा | ➢ सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १७ व १८ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो पिकास काठीच्या/ बांबूंच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| केळी | पक्वता | ➢ मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने केळी झाडांना आधार द्यावा. |
| नारळ | वाढीची | ➢ उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ रोपांना शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| पशुधन | वाढीची | **पुढील ५ दिवस कमाल तापमान ४२.० अंश सेल्सिअस पर्यंत वाढण्याची शक्यता असल्याने जनावरांचे वाढणाऱ्या तापमानापासून संरक्षणासाठी पुढील उपाय करावेत...**<br>➢ म्हशींना घर्मग्रंथी खूप कमी असल्याने व त्यांची त्वचा काळी असल्याने वाढणाऱ्या तापमानाचा गायींपेक्षा म्हशींना त्रास जास्त होतो म्हणून म्हशींना पाण्यात डुंबन्यास सोडावे.<br>➢ जनावरे सावलीच्या ठिकाणी बांधावीत. शक्य असल्यास दिवसातून ४ ते ५ वेळा त्याच्या अंगावर पाणी फवारावे.<br>➢ दुपारच्या वेळेस जनावरे चारावयास नेऊ नयेत. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण : कोल्हापूर**
**दि. : १६.०४.२०२४**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**